# प्रास्ताविक

वाळवा तालुक्यातील स्वातंत्र्य लढा या विषयावरील लघुशोध प्रबंध शिवाजी विद्यापिठाला सादर करतरना मला अत्यानंद होत आहे.

भारताचा स्वातंत्र्य लढा हा जगातील एक अव्वल लोकलढा होता. सामान्य माणसाच्या लोकप्राणालीवरुन दाखवला जाणारा ध्येयवाद , निर्धार , शौर्य , धैर्य , त्याग , बलिदान , शिस्त आदी गुणांचे उच्चपातळीवर दर्शन या लढ्याने घडवीले आहे. मी या लघुशोध प्रबंधामध्ये लोकांच्या हक्कासाठी , न्यायासाठी , स्वातंत्र्य लढ्याचे वाळवा तालुक्यातील क्रांतीकारकांनी जे प्रयत्न केले , त्यांचा आढावा घेण्याचा नम्र प्रयत्न केला आहे.

संपूर्ण भारतामध्ये सन १८५७ पासून इंग्रजांच्या विरुध्द उठाव होण्यास सुरवात झाली. सन १८८५ पासून त्यास संघटीत रुप येवू लागले. १९४२ चा उठाव मोठ्या तिव्रतेने झाला. सातारा जिल्ह्यामध्ये प्रतिसरकारची स्थापना करण्यात आली. या सर्व घडामोडी वाळवा तालुक्यामध्येही मोठ्या प्रमाणात सुरु होत्या. प्रतिसरकारचे कामकाज या तालुक्यामध्ये यशस्वीपणे पार पाडले.

यानिमीत्ताने वाळवा तालुक्यातील क्रांतिकारकांचे कार्य किती महत्त्वाचे होते त्याचा उहापोह मि केला आहे.

सदर लघुशोध प्रबंध तयार करताना, मी स्वातंत्र्य लढ्यावर लिहली गेलेली पुस्तके , अहवाल , कार्यालयातील रेकॉर्डस , १९३० ते १९४७ पर्यंतची दै. केसरीच्या फाईल्स , साप्ताहिक नवयुग व मराठा फाईल्स, ही अभ्यासाची साधने म्हणून अभ्यासली आहेत. त्याच बरोबर वाळवा तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. स्वातंत्र्य लढ्यासंबंधीत ग्रंथांचा वापर केला आहे.

ही अमोल संधी उपलब्ध करुन देण्यात माझे मार्गदर्शक आदरणीय गुरुवर्य डॉ. भा. दे. खणे अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या सहकार्य करुन उत्तेजन दिले आहे. या सर्वांचे ऋण व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजते.

सुरवातीस माझे मार्गदर्शक आदरणीय गुरुवर्ग डॉ. भा. दे. खणे यांनी याकामी अपार परिश्रम घेतलेले आहेत व अनमोल मार्गदर्शन केलेले आहे. वेळोवेळी प्रोत्साहनही दिलेले आहे. त्यामुळे मी हा लघुशोध प्रबंध पूर्ण करु शकले. त्यांचा मला लाभलेला कौटुंबिक जिव्हाळा न विसरता येण्यासारखा आहे. हे सर्व शब्दातीत आहे. अशा या माझ्या गुरुवर्यांचे मी अंत:करण पूर्वक ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. अ. रा. भोसले यांचीही मी आभारी आहे.

कासेगांव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.नाम. जयंतराव पाटील, अर्थ व नियोजन मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांनी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल मी त्यांची मन:पूर्वक आभारी आहे.

कासेगांव शिक्षण संस्थेचे सचिव माननीय श्री. पा. वि. जगताप , सह सचिव आ. डी. सावंत यांचेही ऋणी आहे. त्यांनी मला वेळोवेळी सहकार्य व प्रोत्साहन दिले आहे. विमलनाथ शेटे , रंगरावदादा पाटील , एस. बी. पाटील , डि. जी. देशपांडे , श्रीमती इंदूताई पाटणकर यास्वातंत्र्य सैनिकांचे बहुमोल सहकार्य व प्रोत्साहन मिळाले आहे. याबद्दल यासर्वांचे आभारी आहे. तसेच बर्डे अशोक दादासो, प्राचार्य शरद भोसले यांचीही मी आभारी आहे.

मोमीन कॉम्प्युटर टायपींग सेंटर, इस्लामपूरचे श्री. रियाज मोमीन व श्री. इम्तियाज मोमीन व श्री. बबन करे यांचे त्यांनी वेळेवर केलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहे.

ह्या माझ्या प्रबंधात मला शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर, ग्रंथालयातील सर्व कर्मचारी तसेच दै. केसरी पुणे ऑफीस कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. या सर्वांचे मी आभार व्यक्त करते.

शेवटी या संशोधन कार्यासाठी ज्यांनी मला सहकार्य दिले, प्रोत्साहन दिले आणि सुयश चिंतले त्या सर्व ज्ञात अज्ञातांचे मी अंत:करण पूर्वक ऋण व्यक्त करते.

कोल्हापूर

कु. अरुणा निवृत्ती पाटील

दिनांक : ३०/१२/१९९९